# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## ‘पीएमपीएमएल’ च्या ‘रामवाडी मेट्रो स्टेशन ते लोहगांव एअरपोर्ट’ मेट्रो फिडर सेवेचा शुभारंभ

महाराष्ट्र मेट्रोरेल कार्पोरेशन लि. पुणे यांचे मार्गिका रुबी हॉल मेट्रो स्टेशन ते रामवाडी मेट्रो स्टेशन या मार्गिकेचे उद्घाटन भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी साहेब यांचे शुभहस्ते ऑनलाईन पद्धतीने बुधवार, दि. ०६/०३/२०२४ रोजी करण्यात आले. त्या अनुषंगाने पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत प्रवाशांच्या सोईकरीता दि. ०६/०३/२०२४ पासुन मेट्रो फिडर बससेवा सुरू करण्यात आली असून त्याचा शुभारंभ खा. मेधा कुलकर्णी, आ. सुनील टिंगरे, मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक मा. श्रावण हर्डीकर, पुणे शहराचे माजी महापौर मा. मुरलीधर मोहोळ, मा. आ. जगदिश मुळीक व मा. आ. बापूसाहेब पठारे यांच्या हस्ते मेट्रोच्या रामवाडी स्थानक येथे वातानुकूलित ई-बस ला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

यावेळी पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक मा. नितीन नार्वेकर, मेट्रोचे सिस्टम्स अ‍ॅन्ड ऑपरेशनचे संचालक मा. विनोदकुमार अग्रवाल, मेट्रोचे जनता संपर्क अधिकारी हेमंत सोनवणे, मेट्रोचे वर्क्स संचालक मा. अतुल गाडगीळ, मेट्रोचे जी.एम (एम.एम.आय) मा.कॅ. राजेंद्र सानेर – पाटील, मेट्रोचे संचालक स्टॅटिक प्लॅनिंग मा. अनिल कोकाटे, मेट्रोचे कार्यकारी संचालक ऑपरेशन्स मा. राजेश त्रिवेदी, मेट्रोचे डि.जी.एम मनोज डॅनियल, पुणे महानगर परिवहन महामंडळाचे चीफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) मा. सतिश गव्हाणे, कामगार व जनता संपर्क अधिकारी सतिश गाटे व पुणे स्टेशनचे डेपो मॅनेजर संजय कुसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पीएमपीएमएल कडून सुरु करण्यात येत असलेल्या या मेट्रो फीडर बससेवेमुळे प्रवाशी नागरिकांना मेट्रो स्टेशन्स पर्यंत पोहोचणे सोयीचे होणार आहे. तरी सदरच्या मेट्रो फीडर बससेवांचा लाभ प्रवाशी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे. प्रवासी संख्या व उत्पन्नात वाढ झाल्यास या मार्गांवर पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून आणखी बसेस वाढविण्यात येतील.

- ‘रामवाडी मेट्रो स्टेशन ते लोहगाव एअरपोर्ट’ मेट्रो फिडर सेवेचा मार्ग

| अ.क्र. | मार्ग | मार्गावरील थांबे | वारंवारिता | तिकीट दर |
|---|---|---|---|---|
| १. | रामवाडी मेट्रो स्टेशन ते लोहगांव एअरपोर्ट ( मार्गे – साकोरे नगर) | रामवाडी मेट्रो स्टेशन, हयात हॉटेल, वेकफिल्ड कंपनी, साकोरे नगर, नेक्सा शोरूम, विमाननगर लेन क्र. २२, विमाननगर लेन क्र. २१, सिंबायोसिस कॉलेज विमाननगर, क्रोमा मॉल लोहगांव, लोहगांव एअरपोर्ट. | २५ मिनिटे | अंतरानुसार र.रु. ५ ते र.रु. १० |
| २. | रामवाडी मेट्रो स्टेशन ते लोहगांव एअरपोर्ट ( मार्गे – संजय पार्क लेन नं-६) | लोहगांव एअरपोर्ट, क्रोमा मॉल लोहगांव, सिंबायोसिस कॉलेज विमाननगर, संजय पार्क लेन नं ६, मारुती सुझुकी शोरूम साकोरे नगर, चेक मेट हॉटेल, रामवाडी मेट्रो स्टेशन. | २५ मिनिटे | अंतरानुसार र.रु. ५ ते र.रु. १० |

दि. ०६/०३/२०२४.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.